**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०६ यांची जबानी**
मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :–

**माझे नाव** : **अंबादास शंकर भुसारे**
वय : ५५ वर्षे, व्यवसाय : पोलीस उपअधिक्षक,
नेमणूक : अनुसुचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, नंदुरबार.

**शपथेवर सरतपास अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती सिमा शेख :**

मी सन जुलै २०१७ ते ऑगस्ट २०१८ मध्ये आर्थीक गुन्हे शाखा, अहमदनगर येथे पोलीस निरिक्षक या पदावर कार्यरत होतो. दि.२५/११/२०१७ रोजी पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचे लेखी आदेशन्वये गु.र.नं.५१०/२०१७, भा.दं.वि.कलम ४०८, ४२०, ४७१, ४७७अ जोकी कोतवाली पोलीस स्टेशन येथे नोंदविण्यात आला होता व नंतर आर्थीक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला होता, त्याचा तपास माझेकडे सोपविण्यात आला होता. मला आता दि.२५/११/२०१७ रोजीचा सदर आदेश दाखविला. त्यावर ठाणे अंमलदारांची सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१५२** देण्यात येते.

२. त्यानंतर तत्कालीन तपासी अधिकारी शिवाजी नागवे, पी.एस.आय., कोतवाली पोलीस स्टेशन यांनी त्यांचे तपासादरम्यानचा अहवाल माझेकडे लेखी पत्रान्वये सादर केला. आता मला सदरचा अहवालासोबचे पत्र दाखविण्यात आले. सदरचे पत्र हे तेच असून त्यावर शिवाजी नागवे यांची सही आहे. त्यास **नि.क्र.१५३** देण्यात येते. तसेच मला तपासाकामी मुळ फिर्याद, एफ.आय.आर. व दैनिक अहवाल देखील देण्यात आला होता.

३. दि.०४/१२/२०१७ रोजी विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांचेसोबत मी तपासाच्या अनुशंगाने पत्रव्यवहार केला. आता मला सदरच्या पत्राची मुळ प्रत दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१५४** देण्यात येते. सदरच्या पत्रान्वये मी

या गुन्हयातील आरोपी यांच्या नियुक्तीचे पत्र,पदोन्नतीचे आदेश, आरोपीच्या कामाची नियमावली, तसेच अहमदनगर येथील कार्यालयात रूजु झाल्याबाबतची तारीख, तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती यांचेकडुन प्राप्त झालेली कृषी अवजाराची मागणी पत्र, खतवितरक यांचेसोबत महामंडळाचे झालेले करारनामे व खातेउतारे, शेतकरी व बचटगटाच्या नावांची यादी, आरोपींचे मुळ गांव, सध्याचा राहण्याचा पत्ता व मोबाईल क्रमांक या बाबतची माहिती सदरील नि.क्र.१५४ वरील पत्रान्वये मी मागितली होती.

४. मी पाठविलेल्या पत्राला उत्तर म्हणुन महाराष्ट्र कृषी अद्योग विकास महामंडळ मर्यादित यांनी मला दि.०७/१२/२०१७ रोजी पत्र पाठविले. आता मला सदरचे मुळ पत्र दाखविण्यात आले. त्यास **नि.क्र.१५५** देण्यात येतो. सदरील पत्रासोबत मी मागविलेल्या माहितीच्या सोबतचे कागदपत्रे जोडण्यात आले होते.

५. त्यानंतर मी फिर्यादी भागवत भाऊसाहेब लांबे यांचा दि.११/१२/२०१७ रोजी मी पुरवणी जबाब नोंदविला होता. शैलजा दिलीप दाणी, वासुदेव गणेश महाले, आबासाहेब तुकाराम मुसमाडे यांचा देखील जबाब त्यांचे सांगण्यानुसार मी नोंदविला होता.

६. दि.२२/१/२०१८ रोजी आरोपी रामदास भाऊसाहेब कुलट यांच्या मालमत्तेची माहिती मिळण्यासाठी जिल्हा निबंधक, अहमदनगर यांना मी पत्र दिले होते. आता मला सदरचे मुळ पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१५६** देण्यात येते. मी पाठविलेल्या पत्राला उत्तर म्हणुन जिल्हा उपनिबंधक यांनी दुयम उपनिबंधक, अहमदनगर यांना मी पाठविलेल्या पत्राच्या अनुशंगाने माहिती देण्याबाबत कळविले होते व त्याची एक प्रत मला देण्यात आली होती. त्यास **नि.क्र.१५७** देण्यात येते.

७. त्यानंतर दि.०८/०२/२०१८ रोजी मी शाखाधिकारी ॲक्सीस बॅक, शाखा अहमदनगर यांना पत्र देवुन आरोपी रामदास कुलट यांच्या बॅक खात्याबाबतची माहिती मागविली होती. आता मला सदरचे पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१५८** देण्यात येते. त्यानंतर दि.०८/०२/२०१८ रोजी मी शाखाधिकारी एच.डी.एफ.सी, शाखा–अहमदनगर यांना पत्र देवुन आरोपी रामदास कुलट व त्याचा मुलगा गणेश कुलट यांच्या बॅक खात्याबाबतची माहिती मागविली होती. आता मला सदरचे पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१५९** देण्यात येते. त्यानंतर दि.०९/०२/२०१८ रोजी मी शाखाधिकारी कॉरपोरेशन बॅक, शाखा अहमदनगर यांना पत्र देवुन आरोपी रामदास कुलट यांच्या बॅक खात्याबाबतची माहिती मागविली होती. आता मला सदरचे पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१६०** देण्यात येते.

८. मी वर नमूद बॅकांना पाठविलेल्य पत्राच्या अनुशंगाने ॲक्सीस बॅक, शाखा–अहमदनगर यांनी मला दि.१२/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरवली होती की, त्यांची बॅक ही सदर माहिती शोधुन काढण्यास असमर्थ आहे. सदरच्या पत्रास **नि.क्र.१६१** देण्यात येतो. तसेच एच.डी.एफ.सी बॅक, शाखा अहमदनगर यांनी दि.१२/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले की, आरोपी कुलट याचे खाते त्यांच्या बॅकेतील शाखेत नाही. सदरच्या पत्रास **नि.क्र.१६२** देण्यात येतो. तसेच कॉरपोरेशन बॅक, शाखा अहमदनगर यांनी त्यांच्या दि.०७/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविले की, आरोपीचा मुलगा गणेश कुलट याच्या श्रीगणेश कृषी सेवा केंद्र या नावाने त्यांचे बॅकेत खाते आहे. सदरच्या पत्रास **नि.क्र.१६३** देण्यात येतो.

९. दि.०८/०२/२०१८ रोजी आरोपी रामदास कुलट यास ताब्यात

घेवुन त्यांना अटक केली व त्याबाबतचा पंचनामा दोन पंचाच्या समक्ष तयार करण्यात आला. सदर अटक पंचनाम्यावर माझी व एका पंचाची तसेच आरोपीची देखील सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१६४** देण्यात येतो. त्यानंतर आरोपीची मा.न्यायालयाचे आदेशान्वये कस्टडी घेण्यात आली.

१०. दि.०८/०२/२०१८ रोजी पंजाब नॅशनल बॅक यांना साक्षीदार संजय उगले यांचे मालकीचे अक्षय कृषी सेवा केंद्र, घारगांव, ता.श्रीगोंदा या नावाने असणा–या बॅक खात्याची माहिती मिळण्याबाबत मी पत्र दिले होते. आता मला सदरचे मुळ पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१६५** देण्यात येते. दि.०९/०२/२०१८ रोजी साक्षीदार संजय केरबा उगले यांचा जबाब नोंदविण्यात आला. त्यांनी जबाब दरम्यान कृषी उद्योग विकास महामंडळ यांना धनादेशअन्वये व डी.डी.अन्वये दिलेल्या रकमांबाबत व त्या धनादेश क्रमांक व डी.डी. क्रमांक नमूद असलेल्या वहितील पानांची छायांकित प्रत मला दिली होती. सदर वहितील पानांच्या प्रतींवर साक्षीदार संजय उगले यांची सही देखील आहे.

११. त्यानंतर तपसादरम्यान मी साक्षीदार सुनिल बाळासाहेब शेळके यांचा जबाब त्यांचे सांगण्यानुसार नोंदविला होता. दि.१०/०२/२०१८ रोजी विनोद अमोलकचंद गुंदेचा यांना तपासाकामी हजर राहण्यासाठी पत्र दिले होते. आता मला सदरच्या पत्राची मुळ प्रत दाखविण्यात आली. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१६६** देण्यात येते. त्यांनतर दि.१२/०८/२०१८ रोजी विनोद गुंदेचा हे माझेसमक्ष हजर झाले व त्यांचे सांगण्यानुसार मी त्यांचा जबाब देखील नोंदविला.

१२. तसेच दि.१२/०२/२०१८ रोजी रामदास कुलट व त्यांची मुले

दिनेश व गणेश यांचे सोसायटीत असलेल्या खात्याबाबतचे ओपनिंग पासुनचे खातेउतारे व ठेवीच्या तपशिलाबाबत माहिती मिळण्यासाठी शाखाधिकारी, श्री संत नागेबाबा मल्टीस्टेट सोसायटी, मार्केटयार्ड, अहमदनगर यांना पत्र दिले होते. आता मला सदरच्या पत्राची कार्बन प्रत दाखविण्यात आली. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१६७** देण्यात येते. सदर पत्राच्या अनुशंगाने श्री संत नागेबाबा मल्टीस्टेट सोसायटी, मार्केटयार्ड, अहमदनगर यांनी मला दि.१३/०२/२०१८ रोजीचे पत्र हे मला दि.१४/०२/२०१८ रोजी दिले होते व सदरील पत्रासोबत आरोपी रामदास कुलट व त्यांची मुले गणेश व दिनेश यांचे बॅक खातेउता–याची व बॅक ओपनिंग फॉर्म संबंधित माहिती ही मला दिली होती. सदरचे मुळ पत्र आता मला दाखविण्यात आले. त्यावर संबंधित सोसायटीच्या अधिका–याची सही व बॅकेचा शिक्का आहे.

१३. तपासादरम्यान मी शाखाधिकारी रेहान रफिक शेख, श्री संत नागेबाबा मल्टीस्टेट सोसायटी, मार्केटयार्ड, अहमदनगर यांचा जबाब देखील नोंदवुन घेतला होता. दि.१३/२/२०१८ रोजी साक्षीदार संतोष सदाशिव धोंडगे यांच्या खातेउता–याची माहिती मिळण्यासाठी मी शाखाधिकारी, श्री संत नागेबाबा मल्टीस्टेट को.ऑप. सोसायटी, मार्केटयार्ड, अहमदनगर यांना पत्र दिले होते. आता मला सदरचे तीन मुळ पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यांना अनुक्रमे **नि.क्र.१६८ ते नि.क्र.१७०** देण्यात येते.

१४. तपासादरम्यान किर्तीकुमार वासुदेवदास गांधी यांना तपासाकामी हजर राहणेबाबत मी दि.१३/०२/२०१८ रोजी लेखी पत्र दिले होते. आता मला सदरचे मुळ पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१७१** देण्यात येते.

१५. दि.१५/०२/२०१८ रोजी चेअरमन, अहमदनगर जिल्हा कृषी उद्योग सोसायटी लि. यांना पत्र देवुन आरोपी रामदास कुलट व त्यांची मुले गणेश व दिनेश यांनी घेतलेल्या गाळयाचे भाडेकराराची पत्र मिळणेकामी पत्र दिले होते. आता मला सदरचे मुळ पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१७२** देण्यात येते. त्यानुसार अहमदनगर जिल्हा कृषी उद्योग सोसायटी लि. यांनी सदर करारनाम्याची साक्षांकित प्रत मला दिली होती.

१६. तपासादरम्यान दि.१४/०२/२०१८ रोजी जिल्हा विशेष लेखा परिक्षक वर्ग–१ सहकारी संस्था, अहमदनगर यांना पंचनाम्याकामी दोन शासकिय कर्मचारी पंच म्हणुन देणेबाबत पत्र दिले होते. आता मला सदरचे मुळ पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१७३** देण्यात येते. तपासादरम्यान दि.१५/०२/२०१८ रोजी जिल्हा विशेष लेखा परिक्षक वर्ग–१ सहकारी संस्था, अहमदनगर यांना पंचनाम्याकामी दोन शासकिय कर्मचारी पंच म्हणुन देणेबाबत पत्र दिले होते. आता मला सदरचे मुळ पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१७४** देण्यात येते. मी दिलेल्या पत्राच्या अनुशंगाने आम्हाला तपासादरम्यान दोन पंच पुरवण्यात आले होते.

१७. दि.१६/०२/२०१८ रोजी मी तसेच दोन पंच व वासुदेव गणेश महाले, सहायक व्यवस्थापक, लेखा परिक्षक, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, पुणे तसेच फिर्यादी भागवत लांबे, सौ.शैलजा दाणी असे अहमदनगर येथील महाराष्ट कृषी उद्योग विकास महामंडळ या कार्यालयात गेलो होतो. तेथे वासुदेव महाले यांनी सत्यशोधन अहवाल तयार करताना वापरलेले रजिस्टर सबसिडेअरी कॅश बुक क्र.१ ते ७, वितरकांना सबसिडेअरी नुसार माल मिळाल्याच्या पोहोच पावत्या व टॅक्स इनव्हॉइसच्या कार्बन कॉपीजचा वितरकांनुसार संच क्र.१ ते

९ तसेच महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, उपविभागीय कार्यालय, अहमदनगर या कार्यालयास रकमा प्राप्त झाल्याच्या पावत्यांच्या कार्बन कॉपीजचा संच पान क्र.१ ते ५८ कॉपीज तसेच महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, उपविभागीय कार्यालय, अहमदनगर यांन रकमा प्राप्त झाल्याबाबतचा पावत्यांचा कार्बन कॉपीजचा संच जो पंचायत समिती यांचेकडुन प्राप्त झाला होता व त्याचा क्रमांक १ ते ५८ असा होता. सदरचा मुद्देमाल जप्त करून त्याबाबतचा जप्ती पंचनामा तयार करण्यात आला. सदर जप्ती पंचनाम्यावर माझी तसेच दोन पंच व लेखा व प्रशासन अधिकारी सौ.शैलजा दाणी यांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१७५** देण्यात येते. त्यानंतर जप्त करण्यात आलेल्या कागदपत्रांची मुद्देमाल पावती तयार करण्यात आली. आता मला सदरची पावती जी तीन पानावर आहे ती दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१७६** देण्यात येते.

**सरकारी अभियोक्ता यांचे तोंडी विनंतीवरून उर्वरित सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

(न्यायालयात साक्षीदारासमक्ष असणा-या स्क्रीनवर साक्षीदाराचा संपुर्ण जबाब हा साक्षीदाराला वाचुन दाखविण्यात आला व त्याने त्याबाबतची काहीही तक्रार नसल्याचे सरकारी वकीलांसमक्ष तोंडी सांगितले.)

माझे समक्ष जबाब श्रवणोत्तर स्वीकृत,

**(एस.आर. शिंदे)**
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१८, अहमदनगर.

**दि.१३/१०/२०२५**

**दिनांक १९/०१/२०२६ रोजीचा पुरावा.**

**शपथेवर पुढील सरतपास अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री.डी.एल. वाडेकर यांचेमार्फत सुरू :**

१८. दि.१९/०२/२०१८ रोजी शाखाधिकारी श्री संत नागेबाबा मल्टीस्टेट को.ऑप सोसायटी यांना आरोपी महेश राजुरकर तसेच आरोपी राजेंद्र होले यांची पत्नी मिनल होले यांचा खातेउतारा मिळण्याबाबत पत्र पाठविले होते. आता मला सदर पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१७७** देण्यात येते.

१९. तसेच तपासादरम्यान दि.१९/०२/२०१८ रोजी श्री संत नागेबाबा मल्टीस्टेट को.ऑप. सोसायटी यांना आरोपी राजेंद्र होले यांचे नावावर असलेली मुदत ठेव पावती गोठविण्याबाबत व खात्यातील रकमेच्या माहितीबाबत मी पत्र पाठविले होते. आता मला सदर पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१७८** देण्यात येते.

२०. मी नि.क्र.१७७ व नि.क्र.१७८ अन्वये पाठविलेल्या पत्राला उत्तर म्हणुन तत्कालीन शाखाधिकारी श्री संत नागेबाबा मल्टीस्टेट को.ऑप. सोसायटी यांनी मला पत्र व त्यासोबत राजेंद्र होले यांचा खातेउतारा पाठविला होता. तसेच त्याच पत्रात मिनल होले व आरोपी राजुरकर यांचे खाते त्यांच्या संस्थेत नसल्याबाबत कळविले होते. आता मला सदर पत्र दाखविण्यात आले. त्यास **नि.क्र.१७९** देण्यात येते. तसेच राजेंद्र होले यांचा खातेउतारा दाखविण्यात आला. त्यास **आर्टीकल 'अ'** देण्यात येते.

SACHIN RAJARAM SHINDE
Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.01.19 17:34:49 +0530

२१. दि.१०/०४/२०१८ रोजी कोतवाली पोलीस स्टेशन यांना पत्र देवुन या प्रकरणातील गुन्हयांचे कलमांमध्ये, भा.दं.वि. कलम ४०९ वाढविण्यात

आल्याबाबतचे कळविले होते. आता मला सदर पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. तसेच सदरील पत्र मिळाल्याबाबत तत्कालीन स्टेशन अंमलदार, कोतवाली पोलीस स्टेशन, अहमदनगर यांची सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१८०** देण्यात येते. तसेच सदर कलम वाढीची माहिती तत्कालीन मा.न्यायदंडाधिकारी, अहमदनगर यांना देखील दि.११/०४/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आली होती. आता मला सदर पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१८१** देण्यात येते.

२२. दि.२२/०६/२०१८ रोजी आरोपी क्र.२ महेश राजुरकर व आरोपी क्र.३ राजेंद्र होले यांना गुन्हयाच्या तपासाकामी दोन पंचांसमक्ष अटक करून त्याबाबतचा अटक पंचनामा देखील मी तयार केला होता. आता मला सदरचे दोन पंचनामे दाखविण्यात आले. ते तेच असून त्यावर माझी तसेच आरोपींची सही आहे. त्यांना अनुक्रमे **नि.क्र.१८२ व नि.क्र.१८३** देण्यात येते.

२३. दि.२६/०८/२०१८ रोजी शाखाधिकारी, श्री.संत नागेबाबा मल्टीस्टेट को.ऑप. सोसायटी यांना पत्रान्वये, संतोष धोंडगे यांच्या खाते क्र.२२७२ या खात्यातुन दि.०७/०५/२०१६ रोजी रक्कम रु.८६,०००/– काढण्यात आलेल्या व्हाऊचरची सत्यप्रत मिळण्याबाबत कळविले होते. आता मला सदर पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१८४** देण्यात येते. तसेच मी पाठविलेल्या पत्राच्या अनुशंगाने श्री.संत नागेबाबा मल्टीस्टेट को.ऑप. सोसायटी यांनी मला सदर व्हाउचरची सत्यप्रत सादर केली होती. सदर व्हाउचरच्या सत्यप्रतीस **नि.क्र.१८५** देण्यात येतो.

२४. दि.२६/०६/२०१८ रोजी आरोपी राजेंद्र होले यांचे खातेक्रमांक १३०१६३७ ची माहिती मिळण्याबाबत नगर अर्बन को.ऑप. बॅक लि., शाखा मार्केटयार्ड यांना संबंधित खातेउतारा मिळण्याबाबत मी पत्र दिले होते. आता मला सदर पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१८६** देण्यात येते.

२५. दि.२६/०६/२०१८ रोजी आरोपी क्र.२ राजेंद्र होले व आरोपी क्र.३ महेश राजुरकर यांचे खातेउतारे मिळण्याबाबत एच.डी.एफ.सी. बॅक लि., शाखा अहमदनगर यांना मी पत्र दिले होते. आता मला सदर पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१८७** देण्यात येते.

२६. दि.०८/०८/२०१८ रोजी विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळ यांना सत्यशोधक अहवालासोबत शासकीय रकमेचा अपहार केल्याबाबत कोणत्या देयकाला जोडण्यात आला आहे याबाबतची सविस्तर माहिती कळविण्यात यावी म्हणुन मी पत्र दिले होते. आता मला सदर पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१८८** देण्यात येते.

२७. दि.१३/०८/२०१८ रोजी सहायक व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळ यांना पंचायत समिती, तालुका कृषी विभाग यांना पुरवठा केलेल्या खते, जंतुनाशके, पशुखाद्य, नोगा इत्यादी कृषी अभियांत्रिकी साहित्याच्या रकमांबाबतचे डी.डी. प्राप्त झाल्याबाबतची माहिती व कव्हरिंग लेटर मिळण्याबाबत मी पत्र दिले होते. आता मला सदर पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१८९** देण्यात येते.

SACHIN RAJARAM SHINDE
Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.01.19 17:34:55 +0530

२८. दि.१३/०८/२०१८ रोजी, शाखाधिकारी, कॉर्पोरेशन बॅक, अहमदनगर यांना पत्र देवुन आरोपी रामदास कुलट व त्यांचा मुलगा गणेश कुलट व दिनेश कुलट यांच्या खात्याबाबतची माहिती तसेच गणेश कृषी सेवा केंद्र या नावाने त्यांचे बॅकेत खाते असल्याबाबतची के.वाय.सी. कागदपत्रे मिळावे असे कळविले होते. आता मला सदर पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१९०** देण्यात येते.

२९. दि.१४/०८/२०१८ रोजी निलेश अरूण मुनोत यांना तपासाकामी कागदपत्रांसमवेत हजर राहण्याबाबत मी पत्र दिले होते. आता मला सदर पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१९१** देण्यात येते. त्यानंतर माझी पोलीस स्टेशन घारगांव, ता.संगमनेर येथे बदली झाल्याने या प्रकरणाचा पुढील तपास तत्कालीन पोलीस उपअधिक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, अहमदनगर यांचेकडे तोंडी आदेशान्वये देण्यात आला होता. मी आरोपींना पाहिल्यास ओळखु शकतो. आजरोजी सर्व आरोपी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>शपथेवर उलटतपास आरोपी क्र.१ तर्फे त्यांचे वकील श्री. मोरे यांचेमार्फत</u> :**

३०. महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांच्या कामकाजाची कार्यप्रणालीबाबत माहिती फिर्यादीकडुन तपासादरम्यान मी घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांच्याकडे होणारे व्यवहार हे रोख स्वरूपात होत नसतात. महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मधील कर्मचा-यांची कार्यप्रणाली व डयुटीबाबतची माहिती मी तपासादरम्यान घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मध्ये जमा होणा-या सर्व धनादेशांबाबतचे बॅकेतुन पैसे काढण्याबाबतचे अधिकार हे नाशिक मुख्य

कार्यालय, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांनाच होते व नगर कार्यालय, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांना नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ ही शासनाने चालविलेली संस्था आहे. हे मला नक्की सांगता येणार नाही की, संबंधित महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांचे कर्मचा–यांना शासकीय सेवा नियम लागू होतात का नाही. हे म्हणणे खरे नाही की, ॲक्सीस बॅक, एच.डी.एफ.सी. बॅक व कॉर्पोरेशन बॅक यांनी मी पाठविलेल्या पत्राला उत्तर म्हणुन त्यांचे बॅकेमध्ये या प्रकरणातील आरोपी रामदास कुलट यांचे खाते असल्याबाबत मला कळविले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी रामदास कुलट यांचा ॲक्सीस बॅक, एच.डी.एफ.सी. बॅकेकडुन खातेउतारा मला प्राप्त झाला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी रामदास कुलट यांचा कोर्पोरेशन बॅकेकडुन मला खातेउतारा प्राप्त झाला नव्हता.

३१. संजय केरबा उगले यांनी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ शाखा नगर यांचेविरूध्द केलेल्या तक्रारीची प्रत, तपासी अधिकारी या नात्याने मला दिली नव्हती. मी तपासादरम्यान महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, मुख्य कार्यालय, मुंबई येथील तत्कालीन सरव्यवस्थापक यांचा जबाब तपासादरम्यान नोंदविला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, या प्रकरणातील आरोपी हे नगर शाखा, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ येथे कार्यरत असल्याने व त्यांना महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यातुन रक्कम काढण्याबाबतचा अधिकारच नसल्याने, त्यांनी शासकिय रकमांचा गैरव्यवहार केल्याचा प्रश्न निर्माण होत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला सर्व मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी केवळ फिर्यादी हे वरिष्ठ शासकिय अधिकारी असल्याचे त्यांचे सांगण्यावरून खोटा तपास केला. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

SACHIN RAJARAM SHINDE
Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, o=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.01.19 17:35:01 +0530

**आरोपी क्र.१ तर्फे उलटतपास पुर्ण.**

**शपथेवर उलटतपास आरोपी क्र.२ व ३ तर्फे त्यांचे वकील श्री.व्ही.आर. गुंदेचा यांचेमार्फत :**

३२. हे म्हणणे खरे आहे की, तपासादरम्यान मला हे माहित झाले होते की, आरोपी क्र.२ राजेंद्र होले हे सहायक व्यवस्थापक, पणन खाते, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ येथे सदर पदावर कार्यरत आहेत व आरोपी क्र.३ महेश राजुरकर हे सहायक व्यवस्थापक, पशुखाद्य विभाग, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ येथे कार्यरत आहेत.

**प्रश्न** – तपासादरम्यान तुम्हाला हे निदर्शनास आले होते की, सदरचा व्यवहार हा पशुखाद्य विभाग, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांचेशी निगडीत नाही यावर तुमचे म्हणणे काय ?

**उत्तर** – तपासादरम्यान माझे हे निदर्शनास आले होते की, सदरचा व्यवहार हा खते व अभियांत्रिकी विभाग, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांचेशी निगडीत आहे.

हे म्हणणे खरे नाही की, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ या महामंडळाच्या रकमेचा अपहार झालेला नव्हता ही बाब मला तपासादरम्यान निष्पन्न झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, तपासदरम्यान मी सत्यशोधक अधिकारी श्री.महाले यांचा जबाब नोंदविला नव्हता. साक्षीदार स्वत:हून सांगतात की, त्यांनी श्री.महाले यांचा जबाब नोंदविला होता. हे म्हणणे खरे आहे की, श्री.महाले यांचेकडुन मी स्वत: कोणताही अहवाल प्राप्त केला नव्हता व त्यांनी देखील तपासी अधिकारी या नात्याने माझेकडे कोणताही अहवाल सादर केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ राजेंद्र होले व आरोपी क्र.३ महेश राजुरकर यांचे नियुक्ती पत्र तपासादरम्यान मी हस्तगत केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.३ राजेंद्र होले व आरोपी क्र.३ महेश राजुरकर यांचे नियुक्ती पत्र जे मी हस्तगत केले होते त्यामध्ये त्यांच्या जॉब प्रोफाईल म्हणजेच कार्यप्रणालीचा सविस्तर उल्लेख नाही.

३३. हे म्हणणे खरे नाही की, या प्रकरणातील संपुर्ण व्यवहार हा केवळ

लेखा विभाग म्हणजेच अकाउंट विभाग यांचेशी संबंधित होता. हे मला सांगता येणार नाही की, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यामधील नोंदी ठेवणे हे काम लेखा विभागाचे आहे की नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ राजेंद्र होले व आरोपी क्र.३ महेश राजुरकर यांच्या सहयांचे पडताळणीबाबतची कार्यवाही मी तपासादरम्यान केली नव्हती व त्यामुळे तपासादरम्यान जप्त केलेल्या कागदपत्रांवर नेमक्या कोणाच्या सहया आहेत हे मला आता सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ राजेंद्र होले यांचा श्री.संत नागेबाबा मल्टीस्टे को.ऑप. सोसायटी यांचेकडे पुर्वीपासुनच ठेवी होत्या व त्या कोणत्याही कारणांशिवाय या प्रकरणाच्या अनुशंगाने मी तपासी अधिकारी या नात्याने गोठवल्या आहेत.

**मध्यांतरामुळे उर्वरित उलटतपास दुपार सत्रापर्यंत तहकुब.**

(न्यायालयात साक्षीदारासमक्ष असणा–या स्क्रीनवर साक्षीदाराचा संपुर्ण जबाब हा साक्षीदाराला वाचुन दाखविण्यात आला व त्याने त्याबाबतची काहीही तक्रार नसल्याचे सरकारी वकीलांसमक्ष तोंडी सांगितले.)

माझे समक्ष जबाब श्रवणोत्तर स्वीकृत,

SACHIN RAJARAM SHINDE
Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.01.19 17:35:07 +0530

**(एस.आर. शिंदे)**

**दि.१९/०१/२०२६**

अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१८, अहमदनगर.

**<u>शपथेवर पुढील उलटतपास आरोपी क्र.२ व ३ तर्फे त्यांचे वकील श्री.व्ही.आर. गुंदेचा यांचेमार्फत</u> :**

३४. (आता साक्षीदाराला नि.क्र.१५२ दाखविण्यात आले.) हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१५२ हे उपअधिक्षक, आर्थिक गुन्हे शाखा यांचे नावचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरील नि.क्र.१५२ वरील पत्रामध्ये या प्रकरणाचा तपास मी करावा असे उल्लेखित करण्यात आलेले नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतात की,

त्यांना तोंडी आदेशान्वये या प्रकरणाचा तपास करण्यासाठी सांगण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणाचा तपास करण्याचा मला लेखी आदेश कधीच नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मला या प्रकरणाचा तपास करणेबाबातचा अधिकार नसताना देखील, मी जाणीवपुर्वक श्री. संत नागेबाबा मल्टीस्टेट को.ऑप. सोसायटी यांना आरोपी क्र.२ राजेंद्र होले यांची मुदत ठेव गोठविण्याबाबत नि.क्र.१७८ ला पत्र दिले होते.

३५. (आता साक्षीदाराला नि.क्र.१७८ वरील पत्र दाखविण्यात आले.) हे म्हणणे खरे आहे की, सदर पत्रामध्ये आरोपीच्या मुदत ठेवी या प्रस्तुत प्रकरणातील गुन्हयातील अपहारीत रकमेशी संबंधित आहे असा उल्लेख करण्यात आलेला नाही. हे मला आता सांगता येणार नाही की, आरोपी क्र.२ राजेंद्र होले यांच्या ज्या मुदत ठेवी श्री.संत नागेबाबा मल्टीस्टेट को.ऑप. सोसायटीमध्ये होत्या त्या आरोपी क्र.२ राजेंद्र होले यांनी त्यांना पाचवा, सहावा वेतन आयोगाच्या मिळालेल्या फरकाच्या रकमेतुन सन २०१४ साली केल्या होत्या का नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदरील मुदत ठेवीच्या रकमा नेमक्या कशाच्या आहेत याचा सखोल तपासच केला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, हे मला आजही सांगता येणार नाही की, आरोपी क्र.२ राजेंद्र होले यांच्या श्री.संत नागेबाबा मल्टीस्टेट को.ऑप. सोसायटी मधील मुदत ठेवी या कोणत्या रकमेच्या आहेत.

३६. आरोपी क्र.२ राजेंद्र होले व आरोपी क्र.३ महेश राजुरकर कोण कोणत्या दिवशी त्यांच्या कार्यालयात कर्तव्यानिमित्त हजर होते म्हणजेच त्यांच्या हजेरीपटाच्या नोंदी मी तपासादरम्यान हस्तगत केल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, तपासादरम्यान मला असे देखील निष्पन्न झाले होते की, ब–याचशा पावत्यांवर संबंधित अधिका–यांच्या सहया नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ राजेंद्र होले व आरोपी क्र.३ महेश राजुरकर हे ज्या ज्या दिवशी गैरहजर होते त्या त्या

दिवशी पावत्या तयार करून जाणीवपुर्वक त्यांना या प्रकरणात खोटे गोवण्यात आलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत गुन्हयाच्या संदर्भात असे निष्पन्न झाले होते की, आरोपी क्र.२ राजेंद्र होले व आरोपी क्र.३ महेश राजुरकर यांच्या खात्यात महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाची अपहारीत रकमेपैकी कोणतीही रक्कम जमा झालेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ राजेंद्र होले व आरोपी क्र.३ महेश राजुरकर यांचा प्रस्तुत गुन्हयाशी काहीही संबंध नसताना, केवळ फिर्यादीला मदत व्हावी म्हणुन मी या प्रकरणाचा खोटा तपास केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकुर खोटा व चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

आरोपी क्र.२ व ३ तर्फे उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

(न्यायालयात साक्षीदारासमक्ष असणा–या स्क्रीनवर साक्षीदाराचा संपुर्ण जबाब हा साक्षीदाराला वाचुन दाखविण्यात आला व त्याने त्याबाबतची काहीही तक्रार नसल्याचे सरकारी वकीलांसमक्ष तोंडी सांगितले.)

माझे समक्ष जबाब श्रवणोत्तर स्वीकृत,

SACHIN RAJARAM SHINDE

Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.01.19 17:35:15 +0530

**(एस.आर. शिंदे)**

**दि.१९/०१/२०२६**

अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१८, अहमदनगर.